follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.७२१०५/९९ * वर्ष २६ * अंक ३१४ सातारा * बुधवार दि.१४ ऑगस्ट २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

# तर १५०० परत घेऊ, रवी राणांच्या विधानावर आदिती तटकरेंची प्रतिक्रिया

**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीत मला मतरुपी आशीर्वाद न दिल्यास, लाडकी बहीण योजनेचे १५०० रुपये खात्यातून काढून घेईन, असं विधान आमदार रवी राणा यांनी सोमवारी अमरावतीत एका कार्यक्रमात बोलत केलं होतं. त्यांच्या या विधानानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. या विधानावरून विरोधकांकडून आमदार राणा आणि राज्य सरकारवर टीका करण्यात येत आहे. दरम्यान, यावर आता महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनीही भाष्य केलं आहे.



आदिती तटकरे यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांना आमदार रवी राणा यांच्या विधानाबाबतही विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना, कोणीही अशा प्रकारची विधानं करून गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न कोणीही करू नये, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

### रवी राणांनी नेमकं काय म्हटलं होतं?

आमदार रवी राणा यांनी सोमवारी लाडकी बहीण योजनेबाबत एक विधान केलं होतं. त्यांच्या या विधानानंतर मोठा वाद निर्माण झाला होता. सरकारने महिलांना प्रतिमहिना १५०० रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, दिवाळीनंतर ही रक्कम वाढवून तीन हजार रुपये केली पाहिजे. आज सरकारने तुम्हाला १५०० रुपये दिले आहेत. उद्या तुमचा भाऊ म्हणून मी ही रक्कम तीन हजार करण्याची विनंती सरकारकडे केली, तर तुम्हाला तीन हजार मिळू शकतात. पण ते तेव्हाच शक्य होईल, जेव्हा तुम्ही मला तुमचा भाऊ म्हणून मतरुपी आशीर्वाद द्याल. पण जर तुम्ही या निवडणुकीत मला आशीर्वाद दिला नाही, तर तुमचा भाऊ म्हणून मी तुमच्या खात्यातून लाडकी बहीण योजनेचे १५०० रुपये काढून घेईन, असं आमदार रवी राणा म्हणाले होते.

**नेमकं काय म्हणाल्या आदिती तटकरे?**

रवी राणांनी केलेलं विधान दुर्दैवी आहे. कोणत्याही लोकप्रतिनिधींनी अशा प्रकारचं विधान करणं चुकीचं आहे.

महायुतीच्या सरकारनं ही जी योजना आणली आहे, ती गरीब महिलांच्या सन्मानासाठी आहे. त्या महिलांकडून पैसे परत घेण्याचा असा कोणताही विचार सरकार करत नाही. जास्तीत जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा, हा आमचा उद्देश आहे, त्यामुळे अशा प्रकारची विधानं करून गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न कोणीही करू नये, असं मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या.

## महत्त्वाचे

### सांगलीत वांगी महाग ! श्रावणामुळे घराघरांतून मांसाहार हद्दपार

**सांगली :** ईळपक्षरश्र ीश शशिपीळींश ींहरप लहळलळज्ञशप व्रतवैकल्य आणि सणासुदीमुळे अनेक घरांतून श्रावणात मांसाहार हद्दपार झाल्याने बाजारात चिकनपेक्षा वांगी महाग आहेत. तर तुरीचे उत्पादन कमी झाल्याने तूरडाळही द्विशतकाच्या उंबरठ्यावर पोहोचली आहे.

सांगली बाजारात मंगळवारी चिकनचा दर १३० रुपये किलो तर सांगलीच्या प्रसिद्ध कृष्णाकाठच्या वांग्याचा दर १६० रुपये किलोवर पोहोचला आहे. अनेक कुटुंबांमध्ये श्रावण महिन्यात मांसाहार वर्ज्य केला जातो. यामुळे चिकनचा ग्राहक वर्ग कमी झाला असून ज्या प्रमाणात बाजारात चिकनचा पुरवठा होतो, त्या प्रमाणात उठाव नसल्याने दरात मंदी असल्याचे सांगण्यात येते. तर अंडी दरातही घसरण झाली असून प्रति नग पाच ते साडेपाच रुपये दराने किरकोळ बाजारात अंडी उपलब्ध आहेत. तर चिकनचा दर किलोला १३० रुपये आहे.

सोमवारी दर १४० रुपये होता. २४ तासांत दहा रुपये किलोने दर उतरले आहेत. श्रावण संपल्यानंतर गणेशोत्सव असल्याने या कालावधीतही काही कुटुंबांत मांसाहार वर्ज्य असल्याने अनंत चतुर्दशीनंतरच चिकनची मागणी वाढण्याची चिन्हे असल्याचे चिकन विक्रेत्यांनी सांगितले. भाजीपाला बाजारात वांगी १४० ते १६० रुपये किलोने विकली जात असून ठोक दर १०० ते १२० रुपये प्रति दहा किलो असल्याचे भाजीपाला व्यापारी बागवान यांनी सांगितले.

# नीलम गोऱ्हे यांना मिळाला कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा

## हठरल्या शिवसेनेच्या पहिल्या महिला मंत्री!

**मुंबई :** ठाकरे गटातून शिंदे गटात गेलेल्या शिवसेनेच्या फायरब्रँन्ड नेत्या आणि विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांना आता कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा मिळाला आहे. कॅबिनेटमध्ये अनेक महिला मंत्रीपदी विराजमान झाल्या आहेत. परंतु, शिवसेनेच्या पहिल्या महिला मंत्री म्हणून नीलम गोऱ्हे यांना मान मिळालाय. यासंदर्भात त्यांनी स्वतःहून माहिती दिली.

कॅबिनेट मंत्रीपदाची माहिती देताना नीलम गोऱ्हे म्हणाल्या, मुख्यमंत्री सचिवालयाकडून प्रत आलेली आहे. कॅबिनेट पदाचा दर्जा मला दिलेला आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभारी आहे. महिलांना कॅबिनेट मंत्री पद मिळालेलं आहे. पण शिवसेनेतील महिलेला कॅबिनेट मंत्रीपद मिळणारी मी पहिलीच व्यक्ती आहे, त्याबद्दल मला याबाबत मला फार आनंद वाटतोय.

पेशाने डॉक्टर असलेल्या नीलम गोऱ्हे यांना शिवसेनेतील फायर ब्रॅण्ड नेत्या म्हणतात. महिला आणि दलितांच्या प्रश्नासह अनेक मुद्द्यांवरून त्यांनी रोखठोक भूमिका घेतली आहे. शिवसेनेत फूट पडल्यानंतरही त्यांनी ठाकरे गटाची बाजू लावून धरली होती. महिला आघाडीची तोफ नीलम गोऱ्हे यांनी कायम धडाडत ठेवली. परंतु, काहीच दिवसांपूर्वी त्या शिंदे गटात सामील झाल्या, त्यामुळे त्यांचं उपसभापती पद धोक्यात येतंय की काय अशी परिस्थिती निर्माण झाली.

पक्षांतर केल्याचा दावा करत विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी त्यांना अपात्र ठरवण्याची मागणी विधान परिषदेत केली. परंतु, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात कायदेशीर बाजू स्पष्ट केली. त्यामुळे त्यांचं हे पद कायम राहिलं आहे.



कोणतीही कौटुंबिक राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या नीलम गोऱ्हे या उपसभापती कशा झाल्या हे पाहूयात. महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याकरता नीलम गोऱ्हे यांनी १९७७ साली युवक क्रांती दलातून सामाजिक क्षेत्रात काम करायला सुरुवात केली. परंतु, त्यांनी त्यांची चौकट केवळ महिला चळवळीपुरती मर्यादित ठेवली नाही. ऊसतोडणी कामगार, शोषित, मजूर, भूमीहीन दलित, मजुरांसाठीही त्यांनी चळवळ उभारली. ज्या काळात राजकारणात पुरुषी वातावरण होतं, त्या काळात नीलम गोऱ्हे यांनी आपली राजकीय कारकिर्द जोरात सुरू केली.

# भाजपाला मिळणार महिला किंवा ओबीसी अध्यक्ष

**नवी दिल्ली :** भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी केंद्रीय मंत्री पदाची शपथ ग्रहण केल्यापासून पक्षाचा नवा राष्ट्रीय अध्यक्ष कोण असणार याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. या संदर्भात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्ष यांच्या संयुक्त बैठकीत पक्षाचा आगामी अध्यक्ष महिला किंवा इतर मागास प्रवर्गातील असावा, अशी चर्चा करण्यात आली.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने सरचिटणीस दत्तात्रय होसबळे आणि सह सरचिटणीस अरुण कुमार तर भाजपच्या वतीने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, आरोग्य मंत्री आणि विद्यमान राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा व राजनाथ सिंह उपस्थित होते.

सन २०२९ मध्ये होणारे लोकसभा निवडणुकीपूर्वी संसद आणि राज्यांच्या विधिमंडळामध्ये महिला कोटा अमलात आणला जाणार आहे. त्या पार्श्वभूमीवर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्षपद महिलेला देण्यात यावे, याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

संघाशी विचारविनिमय करून आगामी राष्ट्रीय अध्यक्षाची निवड केली जाईल, अशी ग्वाही भाजपच्या वतीने या बैठकीत देण्यात आली तर सक्षम व्यक्तीला अध्यक्ष म्हणून निवडण्यात यावे, अशी सूचना संघाच्या वतीने करण्यात आली.

# राजकारण घरापर्यंत नेण्यात चूक झाली: अजितदादांची कबुली

**बारामती :** लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांच्या विरोधात सुनेत्रा पवार यांना उभे करण्यात आपली चूक झाली. राजकारण घरापर्यंत आणणे योग्य नाही, अशी कबुली राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रमुख अजित पवार यांनी दिली.

राजकारण घरापर्यंत न्यायला नको होते. सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांच्यात लढत व्हायला नको होती. मात्र, पक्षाच्या संसदीय मंडळाने निर्णय घेतला आणि सुनेत्रा पवार यांना उमेदवारी देण्यात आली. एकदा बाण सुटल्यावर आपण काही करू शकत नाही, असेही पवार म्हणाले.

अजित पवार सध्या जन सन्मान यात्रेत महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. त्यांना रक्षाबंधनासाठी बहिणीकडे जाणार का, अशी विचारणा केली असता, दौऱ्या दरम्यान आपण बारामतीच्या जवळपास असू तर नक्की बहिणीकडे जाऊन राखी बांधून घेऊ, असे अजित पवार म्हणाले.

लोकसभा निवडणुकीत मोठा फटका बसल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने मतदारांना आकृष्ट करण्यासाठी चंग बांधला आहे. पक्षाच्या प्रचार प्रसिद्धीसह अजित पवार यांच्या प्रतिमा संवर्धनासाठी एका खाजगी व्यावसायिक कंपनीला काम देण्यात आले आहे. या कंपनीच्या सांगण्यानुसार अजित पवार गटाने महिला मतदारांवर लक्ष अधिक केंद्रित केले आहे. अजित पवार प्रत्येक जाहीर कार्यक्रमात गुलाबी जाकीटाचा वापर करीत आहेत. त्याचप्रमाणे जन सन्मान यात्रेत सहभागी असलेल्या सर्व गाड्यांना गुलाबी रंग देण्यात आला आहे. या गुलाबी रंगावरून शरद पवार, रोहित पवार यांच्यासारख्या नेत्यांनी अजित पवार यांच्यावर टीकाही केली आहे.

# अन्यथा 'लाडकी बहीण' रद्द करू ! सर्वोच्च न्यायालयाचा राज्य सरकारला इशारा

**नवी दिल्ली :** पुण्यातील एका जमीन अधिग्रहणप्रकरणी राज्य सरकारची कानउघाडणी करताना 'लाडकी बहीण'सारख्या योजना रद्द करण्याचा इशारा सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिला. यावर तातडीने सर्वमान्य तोडगा काढला नाही, तर अधिग्रहित जमिनीवरील बांधकामही तोडून टाकण्याचे आदेश देऊ, असेही न्यायालयाने बजावले.

१९६३ साली राज्य सरकारने पुण्यातील २४ एकर जमीन अधिग्रहित केली होती. मात्र ५०च्या दशकात ही जमीन खरेदी केल्याचा दावा करत याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयापर्यंत सर्व खटले जिंकले होते. असे असतानाही अद्याप भरपाई देण्यात न आल्याने जमिनीच्या मालकांनी पुन्हा सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्यावर मंगळवारी न्या. भूषण गवई आणि न्या. के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर



सुनावणी झाली. यावेळी पुन्हा एकदा राज्य सरकारच्या 'लाडकी बहीण' योजनेचा उल्लेख करताना न्यायालयाने सरकारवर ताशेरे ओढले.

राज्य सरकारने जमीन गमाविलेल्या व्यक्तीला योग्य मोबदला दिला नाही, तर 'लाडकी बहीण'सारख्या योजना आपण बंद करू व वादग्रस्त जमिनीवर झालेले बांधकाम जमीनदोस्त करण्याचे आदेश देऊ, असे न्यायालयाने म्हटले. राज्याच्या मुख्य सचिवांनी मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करावी आणि मोबदल्याची योग्य रक्कम निश्चित करावी, असे निर्देशही न्यायालयाने दिले. यावेळी राज्याच्या मुख्य सचिवांना सुनावणीवेळी हजर राहण्याचे आदेश देण्याबाबतही खंडपीठाने संकेत दिले. याप्रकरणी गेल्या सुनावणीतही न्यायालयाने 'लाडकी बहीण योजनेसाठी तुमच्याकडे पैसे आहेत, मात्र मोबदला देण्यासाठी नाहीत,' अशी सरकारची कानउघाडणी केली होती.

आम्हाला (मोबदल्याची) रक्कम योग्य वाटली नाही, तर तुमची लाडकी बहीण, लाडका भाऊ रद्द करू. (त्या जागेवर) असलेले बांधकाम जमीनदोस्त करण्याचे आदेश देऊ. १९६३पासून जमिनीच्या अवैध ताब्याबद्दल भरपाई देण्याचे निर्देश दिले जातील.

# सहा हजार किमी रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण

**मुंबई :** सुधारित हायब्रिड ॲन्युईटी योजनेंतर्गत राज्यातील सहा हजार किमी रस्त्यांचे डांबरीकरणाऐवजी सिमेंट काँक्रीटीकरण करण्याचा निर्णय बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. आधीच्या मंत्रिमंडळ निर्णयात सहा महिन्यांत बदल करण्याच्या या निर्णयामुळे या प्रकल्पाच्या खर्चात मात्र आठ हजार कोटींची वाढ होऊन ३७ हजार कोटींवर पोहोचला आहे.


राज्य सरकारने सुधारित हायब्रिड ॲन्युईटी योजनेंतर्गत २८ हजार ५०० कोटी रुपये खर्च करून राज्यातील सहा हजार किलोमीटर लांबीच्या १४५ रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचा निर्णय फेब्रुवारी महिन्यात घेतला होता. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या माध्यमातून रस्तांची कामे हाती घेण्यात येणार होती. मात्र आता या रस्त्यांचे डांबरीकरणा ऐवजी सिमेंट काँक्रीटीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहेत. त्यासाठी अडीच वर्षे बांधकामासाठी तर पाच वर्षे दोषदायित्वाची जबाबदारी संबंधित ठेकेदारावरच देण्यात आली आहे. यासाठी राज्य सरकारचा ३० टक्के तर ठेकेदाराचा ७० टक्के वित्तीय सहभाग राहणार आहे. मंत्रिमंडळाने या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे प्रकल्पाच्या किमतीत वाढ झाली आहे. या नव्या निर्णयामुळे सुधारित हायब्रिड ॲन्युईटी योजनेत सरकारच्या सहभागाची रक्कम २५८९ कोटी इतकी वाढली असून एकूण सरकारच्या सहभागाची रक्कम ११ हजार ८९ कोटीस आज मान्यता देण्यात आली.

# हुंबरळी भूस्खलनग्रस्त आजही पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत

## न्याय मागणीसाठी १५ ऑगास्टला आमरण उपोषण करणार

**सातारा :** भूस्खलन मुळे गेले तीन वर्षे उशाला मरण घेऊन राहणाऱ्या हुंबरळी गावाने कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी आपल्या न्याय मागणीसाठी अनेकवेळा शासन दरबारी अर्ज विनंत्या करूनही प्रशासन आमच्या मरणाची वाट बघतेय का? असा संतप्त सवाल हुंबरळी ग्रामस्थांनी केला आहे.येत्या स्वातंत्र्य दिनी बेमुदत आमरण उपोषणाचा निर्णय घेतला असून आता आरपार ची लढाई करण्याचा निर्धार केला आहे.

यावाबत अधिक माहितीनुसार २१ जुलै २०२१





रोजी पाटण तालुक्यात भूस्खलन झाले होते. या भूस्खलन मध्ये कोयना विभागातील मिरगाव, ढोकावळे,ीं हुंबरळी येथे भूस्खलन होऊन मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या नंतर कोयना विभागातील या भूस्खलन ग्रस्त ३ गावांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याबाबत तत्कालीन पुनर्वसनमंत्री विजय वडेट्टीवार यांनी मान्यता दिली होती. त्यानुसार या तिन्ही गावांचे कायमस्वरूपी शंभर टक्के पुनर्वसन करण्याबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी शेखर सिंह यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता या. प्रस्तावानुसार मिरगाव व ढोकावळे या गावातील सर्व बाधित कुटुंबां चे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्या बाबत कार्यवाही सुरू आहे.

हुंबराळी गावात भूस्खलन झाले असले तरी हुंबरळीचे नावाखाली हुंबरळी चे एक वाडीला पुनर्वसना मध्ये सहभागी करून घेतले आहे जेथे २०२१ ला ज्या बाधित कुटुंबाचे नुकसान झाले आहे त्यांना पुनर्वसनाच्या यादीत न घेता ज्यांचे एका पै चेही नुकसान झाले नाही अश्या कुटुंबांना पुनर्वसनाचा लाभ देण्याचा अजब प्रकार झाला आहे. याबाबत बाधित झालेल्या हुंबरळी येथील कुटुंबांनी आपल्या न्याय मागणीसाठी अनेकवेळा प्रशासनाचे गेले तीन वर्ष उंबरठे झिजवले आहेत मात्र प्रशासनाला या ग्रामस्थांच्या न्याय मागणीसाठी लक्ष देण्यास वेळ मिळाला नाही.

आम्हाला मरायचे नाही आमच्या भावी पिढीसाठी जगायचे आहे, म्हणूनच स्वातंत्र्यदिनी आमच्या लोकशाही मार्गाने गावाच्या स्वांतत्र्य साठी आम्ही सर्व ग्रामस्थ लढाईसाठी तयार आहोत. अशा आशयाची उपोषण करण्याची निवेदन ग्रामस्थांनी मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, ते जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवली आहेत.

### तो झारीतील शुक्राचार्य कोण

**हुंबरळीचे भूस्खलन मध्ये नुकसान होऊनही गावाला कायमस्वरूपी पुनर्वसन पासून वंचित ठेवणारा तो झारीतील शुक्राचार्य कोण आहे. असा सवाल ग्रामस्थ विचारात आहेत. गेले तीन वर्ष मरण उशाला घेऊन राहणाऱ्या २३४ कुटुंबातील माणसांच्या पुन्हा भूस्खलन होऊन त्यांच्या मरणाची वाट शासन बघत आहे का असेही प्रश्न विचारले जात आहेत.**

## स्थित्यंतर

# वंगभूमीतील अराजकाचा भारताला धोका!



राही भिडे
9867521049

बांगला देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या पंतप्रधानाला सत्ता गमावून देश सोडावा लागला. यावर्षी जानेवारीत झालेल्या निवडणुकीत शेख हसिना यांच्या अवामी लीगने दोन तृतीयांशपेक्षा जास्त जागा जिंकल्या होत्या. त्या सलग चौथ्यांदा पंतप्रधान म्हणून निवडून आल्या; पण सात महिन्यातच त्यांना आपल्या देशातून पळून जावे लागले. आता तिथे अंतरिम सरकार आले आहे. निवडणुकीनंतर कोणते सरकार अस्तित्वात येते, हे ठरेल; परंतु या घडामोडींचा फटका राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या भारताला बसणार आहे हे निश्चित.

बांगला देश हा दक्षिण आशियातील एकमेव स्थिर आणि भारताचा मित्र असलेला देश होता. तिथल्या ताज्या घडामोडीने भारताला चिंता वाटणे स्वाभाविक आहे. आता आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थतज्ज्ञ महंमद युनूस यांच्या हाती सूत्रे असली, तरी पडद्यामागून लष्करच कारभार पाहणार हे स्पष्ट आहे. भारताच्या शेजारी राष्ट्रांमध्ये बांगला देश हा एकमेव देश होता, जिथे राजकीय स्थैर्य तर होतेच पण भारतासोबतचे संबंधही चांगले होते. भारताच्या मदतीने बांगला देशची निर्मिती झाली आणि तेव्हापासून संबंध चांगले होते. बांगला देशच्या राजकारणात सध्या दोनच मोठे चेहरे आहेत. अवामी लीगच्या शेख हसिना आणि 'बांगला देश नॅशनलिस्ट पार्टी'च्या (बीएनपी) खालिदा झिया. साडेतीन दशकांपासून बांगला देशाची सत्ता कधी खालिदा यांच्याकडे तर कधी हसिना यांच्याकडे आहे; पण भारताच्या दृष्टिकोनातून हसिना सत्तेत असणे अधिक फायदेशीर आहे. हसिना भारताशी जवळीक साधून होत्या. त्यांनी तिस्ता प्रकल्पाचे काम भारताला दिले होते. खालिदा यांचा 'बीएनपी' इस्लामिक कट्टरतावादाकडे अधिक झुकलेला पक्ष आहे. तो भारतापेक्षा पाकिस्तानच्या जवळ असल्याने याचा फायदा चीनला होतो, कारण पाकिस्तान चीनचा चांगला मित्र आहे. २००९ मध्ये हसिना पंतप्रधान झाल्यापासून भारत आणि बांगला देशमधील संबंध अधिक घट्ट झाले होते. हसिना यांच्या सरकारच्या काळात बांगला देशात केवळ भारतविरोधी दहशतवादी गट संपुष्टात तर आले नाहीत तर आर्थिक संबंधही सुधारले. भारत आणि बांगला देश यांच्यात मोठा व्यापार आहे आणि हा व्यापार भारताच्या फायद्याचा असतो. भारताने २०२३-२४ मध्ये बांगला देशातून १५ हजार २६८ कोटी रुपयांचा माल आयात केला, तर बांगला देशाला ९१ हजार ६१४ कोटी रुपयांची निर्यात झाली. एप्रिल आणि मे या दोन महिन्यांत दोन्ही देशांमध्ये १७ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त व्यापार झाला. बांगला देशातील सध्याच्या परिस्थितीचा व्यवसायावर परिणाम होण्याची शक्यता आहे. भारताने २०१६ पासून बांगला देशाला पायाभूत सुविधांच्या विकासासाठी खूप मदत केली आहे. भारताने बांगला देशाला ८ अब्ज डॉलर्सची क्रेडिट लाइन दिली आहे. त्याच्या मदतीने तेथे रेल्वे, रस्ते आणि बंदरे बांधली जात आहेत.

भारताने बांगला देशामध्ये १२० दशलक्ष डॉलरहून अधिक गुंतवणूक केली आहे. याशिवाय राजकीय आणि आर्थिक अस्थिरतेचा परिणाम तेथे कार्यरत असलेल्या भारतीय कंपन्यांवर होण्याची शक्यता आहे. जोपर्यंत परिस्थिती पूर्ववत होत नाही, तोपर्यंत या कंपन्यांच्या उत्पन्नावर परिणाम होऊ शकतो. भारताच्या ईशान्य भागात अतिरेकी पसरल्यावर तेथील अतिरेकी गटांना बांगला देशात आश्रय देण्यात आला होता. त्यांना शस्त्रे आणि पैसेही देण्यात आले. नव्या व्यवस्थेत भारतासाठी ही मोठी समस्या असेल, कारण पाकिस्तानही काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी कारवाया वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. अशा परिस्थितीत दोन्ही बाजूंच्या अशा कारवाया देशासमोर समस्या निर्माण करणार आहेत. भारताच्या ईशान्येकडील राज्यांशी संपर्क साधण्यासाठी बांगला देशदेखील एक प्रमुख साधन होते. नवीन सरकारने भारताला सहकार्य केले नाही, तर ईशान्येशी संपर्क पुन्हा 'चिकन नेक'द्वारे होईल. सामरिक दृष्टिकोनातून चीनशी स्पर्धा करण्यासाठी ही बाब खूप महत्त्वाची होती. गेल्या वर्षी दोन्ही देशांनी मुक्त व्यापार करार (एफटीए) संदर्भात आपापसात करारावर चर्चा करण्यास सुरुवात केली. या करारामुळे बांगला देशाला मोठा फायदा होणार असला, तरी भारताचा व्यापारही जवळपास दोनशे टक्क्यांनी वाढणार आहे. सत्तापालटानंतर तिथे पुन्हा अल्पसंख्याकांना लक्ष्य केले जात आहे. त्यामुळे भारताला पुन्हा एकदा निर्वासितांच्या समस्येला सामोरे जावे लागणार आहे. बांगला देशातून अनेक वस्तू भारतात आयात केल्या जातात. यामध्ये कपडे, ताग, तागाच्या वस्तू, कृषी उत्पादने, चामड्याच्या वस्तू, प्रक्रिया केलेले पदार्थ आणि फळे आणि भाज्यांचा समावेश आहे. केवळ भारतातच नाही, तर बांगला देशातील कापड आणि वस्त्रांना अनेक देशांमध्ये मागणी आहे. चांगली गुणवत्ता आणि स्पर्धात्मक किंमतीमुळे बांगला देशातून निटवेअर आणि तयार कपडे भारतात मोठ्या प्रमाणावर आयात केले जातात; परंतु राजकीय संकटामुळे भारताच्या कापड बाजारावर मोठ्या प्रमाणावर परिणाम होऊ शकतो. भारत अनेक फार्मास्युटिकल फॉर्म्युलेशन तसेच कच्चा माल बांगलादेशातून आयात करतो, कारण बांगलादेश फार्मास्युटिकल आणि जेनेरिक औषधांचाही मोठा निर्यातदार बनला आहे. त्याचप्रमाणे उच्च दर्जाचे चामडेही बांगला देशातून आयात केले जाते. त्यातून पर्स, पिशव्या, शूजही बनवले जातात. भारत केवळ बांगला देशातून माल आयात करतो असे नाही, तर भारतातून बांगला देशातही अनेक वस्तूंची निर्यात केली जाते. गेल्या आर्थिक वर्षात भारतातून बांगला देशात ६,०५२ वस्तूंची निर्यात झाली. कापसाचे धागे, धान्य, पेट्रोलियम पदार्थ, कापसाचे कपडे प्रामुख्याने भारतातून निर्यात केले जातात. बांगला देशातील अराजकतेमुळे अल्पावधीत भारतीय बाजारांवर परिणाम होणार नाही; मात्र हे राजकीय संकट दीर्घकाळ असेच चालू राहिले तर परिणाम होईल. त्याचवेळी बांगला देशातील राजकीय संकटाचा फायदा भारतीय वस्त्रोद्योग क्षेत्राला होण्याची शक्यता आहे, कारण तिथून होणाऱ्या निर्यातीचा मोठा भाग भारतात स्थलांतरित होऊ शकतो. बांगला देशातील अशांत वातावरणानंतर आंतरराष्ट्रीय खरेदीदार इतर पर्यायांच्या शोधात आहेत आणि त्यांच्या दृष्टीने भारत प्रबळ दावेदार आहे. बांगला देशाच्या निर्यातीपैकी १० ते ११ टक्के निर्यात भारतात आली, तर भारताला दर महिन्याला ३०० ते ४०० दशलक्ष डॉलर्सचा अतिरिक्त व्यवसाय मिळू शकतो. बांगला देशाला युरोपीय संघ, ब्रिटन आणि अमेरिका यांसारख्या मोठ्या बाजारपेठांमधून जास्तीत जास्त ऑर्डर मिळतात. आता, बदललेल्या परिस्थितीत, निर्यातदार २०२४-२५ मध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत १० टक्के अधिक ऑर्डरचा अंदाज व्यक्त करत आहेत.

भारताची मासिक कापड निर्यात सुमारे १.३ ते १.५ अब्ज डॉलर्स आहे. तथापि, भारताला १० टक्क्यांहून अधिक ऑर्डर मिळाल्या, तरीही त्या सहज पूर्ण करण्याची क्षमता भारताकडे आहे. गेल्या वर्षी बांगला देशाने सुमारे ४७ अब्ज डॉलरच्या कापडाची निर्यात केली होती. या वर्षी ते ५० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त अपेक्षित होते; मात्र तिथल्या अस्थिरतेमुळे कापड उद्योगाचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक भारतीय कंपन्यांनी बांगला देशात उत्पादन युनिट्स सुरू केल्या होत्या. तिथल्या उद्योगात त्यांचा वाटा सुमारे २५ टक्के आहे. आता बांगलादेशातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे, या कंपन्या त्यांचे कामकाज भारतात आणू शकतात. वस्तूंच्या वाहतुकीला होणारा विलंब ख्रिसमस हंगामासाठीच्या पुरवठा साखळीवर परिणाम करीत आहे. भारताला याचा धोरणात्मक फायदा होणार असून त्यामुळे देशाच्या कापड निर्यातीला गती मिळू शकेल.



# फलटण तालुक्यात राजे गटाला मोठे खिंडार

## माजी जिल्हा परिषद अध्यक्ष माणिकराव सोनवलकर यांचा भाजपामध्ये प्रवेश

**फलटण :** फलटण तालुक्यात राजे गटाला मोठे खिंडार पडले असून माजी जिल्हा परिषद अध्यक्ष माणिकराव सोनवलकर यांनी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये प्रवेश केला असून त्यांचे भाजपमध्ये स्वागत भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले.

सातारा जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष व दोन वेळा जिल्हा परिषद सदस्य असलेले माणिकराव सोनवलकर यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व मा. खासदार रणजितसिह नाईक निंबाळकर यांच्या उपस्थितीत प्रवेश केल्याने आज तालुक्यात या अनपेक्षित प्रवेशाची जोरदार चर्चा रंगली होती.

फलटण तालुक्यातील धनगर समाजातील चळवळीत काम करणारे व सर्वसामान्य जनतेत मिसळणारे नेतृत्व म्हणून त्यांचेकडे बघितले जाते. आज पर्यंत राजे गटाची कोळकी जिल्हा परिषद गटात धुरा ते संभाळत आहे. त्यांच्या पत्नी ही जिल्हा परिषद सदस्य होत्या व सरपंच पण आहे. राजे गटाचे अनेक कार्यकर्ते कार्यपद्धतीवर नाराज असून लवकरच त्यांचे प्रवेश होतील असे पक्ष प्रवेश नंतर माणिकराव सोनवलकर यांनी सांगितले. तसेच माजी खासदार रणजितसिह नाईक निंबाळकर यांच्या कार्य पध्दतीमुळे आम्ही भारावून गेलो आहे. तालुक्यामध्ये रणजीतदादा नी विकास कामांचा मोठा डोंगर उभारला आहे तसेच सर्वांना बरोबर घेऊन जाणारे नेतृत्व म्हणून दादाकडे तालुका पाहातो. खरे तर आ. रामराजे नाईक निंबाळकर यांनी लोकसभेला रणजितसिह यांना विरोध करायला नको होता. परंतु स्वताच्या राजकीय फायद्यासाठी तालुक्यातील जनतेचे फार मोठे नुकसान त्यांनी केले आहे ही खंत तालुक्यातील जनतेला आहे. त्यामुळे या तालुक्याचा आमदार भाजपचा व माजी खासदार रणजितसिह नाईक निंबाळकर यांच्या विचारांचा करण्यासाठी आम्ही पक्ष प्रवेश केला आहे. यापुढे तालुक्यात भाजपचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी मोठ्या जिद्दीने काम करणार आहे असे माणिकराव सोनवलकर यांनी सांगितले

या पक्ष प्रवेशवेळी पंचायत समितीचे माजी सभापती शिवरूपराजे खर्डेकर, संतकृपा उद्योग समुहचे चेअरमन व भाजप नेते विलासराव नलवडे ,पंचायत समिती माजी सदस्य धनंजय साळुंखे पाटील, जिल्हा सरचिटणीस जयकुमार शिंदे, विधानसभा प्रमुख सचिन कांबळे पाटील, युवा नेते अभिजित नाईक निंबाळकर, सोनवडीचे नेते लक्ष्मणराव सोनवलकर दुधेबावीचे सचिन चांगण , उत्तमराव सोनवलकर, लतीफभाई तांबोळी, मनोज कांबळे उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी खा रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी फलटण तालुक्यातील अनेक नेते मंडळी लवकरच भाजपा मध्ये प्रवेश करणार असून एकतर्फी राजकारणाला आणि भ्रष्टाचाराला जनता कंटाळली आहे त्यामुळे तालुक्यात यावेळी विधानसभा निवडणुकीत निश्चितच परिवर्तन घडणार असून सर्वत्र भाजपची सत्ता आणणारच असे रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी सांगितले.

# महाराष्ट्र राज्य वडार समाज संघाचे पुन्हा प्रशासनाला निवेदन

**प्रशासनाच्या विरोधात कोणतीही तक्रार नसल्याचा दिला निर्वाळा**

**सातारा :** महाराष्ट्र राज्य वडार समाज संघ हा जिल्हा प्रशासनाच्या विरोधात नाही .संघटनेच्या नावाखाली काही जण प्रशासनावर दबाव टाकत आहेत यामध्ये दिलीप कुऱ्हाडे हे गेले पंधरा ते वीस वर्षे या व्यवसायात आहेत त्यांनी कधीही वडार समाजातील गरीब घटकांना बरोबर व्यवसाय केला नाही केवळ वैयक्तिक विचार केला आहे मौजे नागेवाडी सर्वे नंबर ३०८ येथे गेले वीस वर्ष व्यवसाय करत आहेत त्यांनी खाण नंबर आठ घेतली आहे समाजातील लोकांना पारंपारिक व्यवसायासाठी जिल्हाधिकारी सातारा यांनी राखीव ठेवलेल्या पाच खाणी समाजाला मिळू नये यासाठी हायकोर्टात त्यांचे प्रयत्न सुरू आहेत सदर व्यक्ती कायम खोटे



बोलून अधिकाऱ्यांवर दबाव आणत असून सगळ्यांची बदन करत आहेत असा आरोप महाराष्ट्र राज्य वडार समाज संघाचे सातारा जिल्हाध्यक्ष रामचंद्र नलावडे यांनी केला

यावेळी माजी नगरसेवक रवी माने उपस्थित होते याबाबतचे निवेदन प्रशासनाला सादर करण्यात आले आहे .कुऱ्हाडे यांच्या मागे वडार समाजातील पाच टक्के सुद्धा लोक नाहीत समाजाच्या नावाने कोट्यावधी रुपये कमवलेले आहेत वडार संघटनेच्या माध्यमातून आम्हाला एकूण पाच खाण प्लॉट मिळाले पण त्याचे श्रेयस कुराडे घेतात समाजाला अंधारात ठेवून दोन प्लॉट लिलावात काढायला सांगतात . प्रशासनाने एकूण पाच प्लॉट म्हणजे बारा हेक्टर राखीव जागा ठेवले असताना त्याचा उपभोग आम्हाला घेता आलेला नाही .त्याचे मूळ कारण कुऱ्हाडे हेच आहेत समाजाच्या प्रत्येक कामासाठी प्रयत्न करीत असून सर्व कामांमध्ये हीच व्यक्ती सातत्याने अडथळा आणत आहेत प्रशासनावर दबाव तंत्र वापरून ते स्वतः चा फायदा करून घेतात .सध्या प्लॉट नंबर १५ मध्ये वडार समाजाला परवाना देण्यात आला आहे त्याचे २५ सभासद आहेत २५ सभासदांचा रोजी रोटीचा प्रश्न कलेक्टर साहेबांनी सोडवला आहे त्याच प्लॉटवर कुराडे आणि त्यांच्या नातेवाईकांनी व्यवसायासाठी परवाना मागितला होता जिल्हाधिकाऱ्यांनी सोसायटीमधील २५ सभासदांचा विचार करून परवाना दिला आहे त्यांच्या विरोधात कुराडे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली परंतु हा दावा निकाली काढण्यात आलेला आहे शासनाने आतापर्यंत वडार समाजाला वेळोवेळी सहकार्य केले आहे.

# जोशी हॉस्पिटलतर्फे फलटणला दि. १३ ऑक्टोबर रोजी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**फलटण :** जोशी हॉस्पिटल प्रा. लि. आणि फलटण रोबोटिक्स सेंटरच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे जागतिक अस्थिरोग दिनानिमित्त मॅरेथॉनचे आयोजन रविवार दि. १३ आक्टोंबर २०२४ रोजी सकाळी ६ वा. सजाई गार्डन मंगल कार्यालय, फलटण येथे करण्यात येत असल्याचे निमंत्रक डॉ. प्रसाद जोशी व डॉ. सौ. प्राची जोशी यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

जागतिक अस्थिरोग दिनानिमित्त जोशी हास्पिटल गेल्या ९ वर्षापासून हा दिन साजरा करत आहे. मानवी जीवन आनंदी व समाधानी असावे, त्यासाठी निरोगी मनाची आणि निरोगी मनाच्या वास्तव्यासाठी निरोगी शरीराची आंवश्यकता असते. शरीर निरोगी ठेवण्यात आहार व व्यायाम यांचा मुख्य वाटा असून देशाच्या जडणघडणीत युवकांचे योगदान महत्त्वाचे असल्याने युवा पिढीला समजावून घेवून त्यांच्याशी सुसंवाद प्रस्थापित करणे हे सामाजिक कर्तव्य असून जागतिक अस्थिरोग दिनानिमित्त आयोजित मॅरेथॉनचा २५ ते ७५ वर्षे वयोगटातील सर्वांना व्यायामाचे महत्त्व समजावून देणे व प्रबोधन करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. गेल्या २४ वर्षापासून फलटण कार्यक्रम हा त्यादृष्टीने खारीचा वाटा असल्याचे डॉ. प्रसाद जोशी यांनी स्पष्ट येथे कार्यरत असताना अस्थिरोग उपचार, सांधेरोपण शस्त्रक्रिया आणि मणक्यांवरील शस्त्रक्रिया करून अविरत उपचार देणे चालूच आहे सदरचे पेशंट आमच्या कुटुंबाचा एक भाग असल्याने सर्वांनी एकत्र येवून दि.१३ आक्टोबर २०२४ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. प्रसाद जोशी यांनी सर्वांना केले आहे. या वर्षी प्रमुख पाहुण्या म्हणून मुंबई पोलिसच्या पहिल्या महिला कमिशनर, ॲडव्होकेट आणि आयपीएस ऑफिसर सौ. मीरा बोरवणकर चड्ढा या येणार आहेत. त्याच बरोबर एशियन गेम्स चॅम्पियन आणि ऑलंपिक मेडलिस्ट सौ. ललिता बाबर या सुद्धा आत्ता पर्यंत वैशिष्ट्य ठरले आहे. ह्या मॅरॅथॉन साठीचे रजिस्ट्रेशन १५ ऑगस्ट २०२४ रोजी खुले होणार आहे असे डॉ. प्रसाद जोशी यांनी सांगितले. हे रजिस्ट्रेशन मऑनलाईन पद्धतीने या वेळी महिलांचा सहभाग www.joshihospitalpvtltd. com जास्त अपेक्षित असून महिलांचे या वेबसाईट वर करता येईल १५ ऑगस्ट २०२४ रोजी मॅरॅथॉनचे सर्व तपशील आपल्याला कळवले जातील आणि ते आपण वरील वेबसाईटवर सुद्धा पाहू शकाल, असेही डॉ. प्रसाद जोशी यांनी सांगितले आहे.

# बालकामगार ठेवणारी कंपनी बंद करा : गायकवाड

**सातारा :** खंडाळा तालुक्यातील हायटेक प्लास्टिक प्रा. लिमिटेड कंपनीत मोठया प्रमाणात बालकामगार मजूर काम करत आहेत. संबधित ठेकेदार हा या मजुरांचे शोषण करत असून सदर कंपनी तात्काळ बंद करावी. अन्यथा स्वातंत्र्यदिनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा रिपाइं आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष अशोक गायकवाड यांनी दिला. शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी महिला जिल्हाध्यक्षा पूजा बनसोडे, तालुकाध्यक्ष आप्पा तुपे, अजय घाडगे, अक्षय शिंदे उपस्थित होते.

अशोक गायकवाड म्हणाले, सातारा जिल्ह्यात असणाऱ्या सर्रास एमआयडीसी बालकामगार आहेत. त्यात खंडाळ्यात हायटेक प्लास्टिक प्रा. लिमिटेड कंपनीत बालकामगार जास्त आहेत. या कामगारांचे वय १५-१८ वर्षे इतके असून या कंपनीत प्लास्टिक बाटल्या तयार केल्या जात आहेत. लहान मुले कामाला ठेवणे हा कायद्याने गुन्हा असून याबाबत वारंवार तक्रार केली असून दखल घेतली जात नाही.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# लोकशाहीची चेष्टा व झुंडशाही केल्यास खपवून घेणार नाही : आ. बाळासाहेब पाटील



**मसूर :** विधानसभेच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्या विशेष संक्षिप्त पुनर्नरीक्षण सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. मतदार याद्यांमध्ये विरोधकांकडून जाणीवपूर्वक फेरफार केला जाण्याची शक्यता आहे. कार्यकर्त्यांनी सतर्क राहून मतदार याद्यांचे निरीक्षण करावे. विधानसभेनंतर जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका-महानगरपालिका, ग्रामपंचायतीच्या निवडणुका जाहीर होतील. त्यासाठीही याच मतदार याद्या वापरण्यात येणार आहेत. मतदार यादीत जाणीवपूर्वक हस्तक्षेप करून कोणी लोकशाहीची चेष्टा व झुंडशाही करत असेल तर खपवून घेणार नाही. त्यांच्यावर योग्य त्या कायदेशीर मार्ग अवलंबला जाईल असा इशारा माजी सहकार व पणन मंत्री, माजी पालकमंत्री आ. बाळासाहेब पाटील यांनी बोलताना दिला. यशवंतनगर ता. कराड येथे कराड उत्तर विधानसभा मतदार संघाच्या मतदार याद्या अनुषंगाने आयोजित मेळाव्यात बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील माने, महाराष्ट्र लेखा परिषदेचे सदस्य शहाजीराव क्षिरसागर, माजी सनदी अधिकारी तानाजीराव साळुंखे, कराड उत्तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष देवराज पाटील, माजी जि प सदस्य जितेंद्र पवार, माजी अर्थ, कृषी सभापती मानसिंगराव जगदाळे, प्रशांत यादव प्रमुख उपस्थित होते.

आ. पाटील म्हणाले आधुनिक युगात मोबाईलद्वारे मतदार नोंदणी करता येत आहे. मतदार यादीत जाणून बुजून कोणी हस्तक्षेप केला तर त्याच्यावर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आहेत. त्यासाठी कार्यकर्त्यांनी सतर्कता बाळगावी. विरोधकांच्याकडून मतदान यादीत जाणीवपूर्वक फेरफार करण्याची शक्यता आहे. गावाशी, मतदार संघाशी संबंधित नसणारी नावे मतदार यादीत समाविष्ट होत असल्यास कार्यकर्त्यांनी लक्षात आणून द्यावीत. आपल्या हक्काची नावे मतदार यादीत घेण्यासाठी, गावात नव्याने समाविष्ट होणारे मतदार, परगावी असणारे मतदार यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहावे. पूर्वी कराड उत्तर मध्ये ३३९ बुथ होते. आता त्या मध्ये वाढ होऊन बुथ संख्या ३५६ झालेली आहे. कार्यकर्त्यांची जबाबदारी वाढलेली आहे. शहाजी क्षीरसागर यांनी प्रास्ताविक केले. प्रशांत यादव यांनी सूत्रसंचालन केले. देवराज पाटील यांनी आभार मानले.

लोकसभेप्रमाणेच विधानसभेला महाराष्ट्रात महाआघाडी सरकारसाठी अनुकूल वातावरण आहे. सध्या महायुतीत समन्वय नाही. राज्य सरकारचे विरोधात वातावरण आहे. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून मतदान आम्हालाच करा असे महिलांना धमकवण्याचे काम सुरू आहे. योजना या कोणत्या एका पक्षाच्या नसून त्या शासनाच्या असतात. राजकीय दृष्ट्या महाराष्ट्राची अधोगती सुरू झाली आहे. यातून महाराष्ट्राची बदनामी होत आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये शिवस्वराज्य यात्रा मतदारसंघात येणार असून त्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे - आमदार बाळासाहेब पाटील.

कोरेगाव मतदारसंघाप्रमाणे कराड उत्तरमध्येही मतदार याद्यांमध्ये विरोधकांकडून हेराफारी होण्याची शक्यता आहे. मतदान हा घटनात्मक अधिकार आहे. कार्यकर्त्यांनी जागृता दाखवल्यास आठ ते दहा हजार मतदान वाढणार आहे. कार्यकर्ता हा नेहमी कार्यकर्ता असला पाहिजे.

## तीर्थक्षेत्र सोळशी सोळा शिवलिंगी श्री शनैश्वर देवस्थान येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन

**कोरेगाव :** श्रावण निज मास याचे निमित्त साधत तीर्थक्षेत्र सोळशी ता कोरेगाव येथील श्री शनैश्वर देवस्थान परिसरामध्ये शनिवार दिनांक १० ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट दरम्यान विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मठाधिपती प.पू.शिवयोगी नंदगिरी महाराज यांनी दिली आहे.

धार्मिक स्थळासह सामाजिक प्रबोधनाचे अधिष्ठान म्हणून नावारूपास आलेल्या सोळशी येथिल ब वर्ग देवस्थानाकडून नेहमीच विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.श्रावण निज मास याचे औचित्य साधत ऑगस्ट महिन्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानुसार शनिवार दिनांक १० ऑगस्ट रोजी दिप प्रज्वलन ,एक भक्त एक वृक्ष अनुसार वृक्षांचे वाटप करण्यात येणार आहे.तसेच नादब्रह्म सामुहिक पखावज वादन व सिने कलाकार शिवराज फाटक प्रस्तूत घरी बसा पोटभर हसा गितांचा बहरदार कार्यक्रम होणार आहे.१७ ऑगस्ट रोजी एकनाथी भारूड, मंगळागौर व भरतनाट्यम कार्यक्रमांचे आयोजन आहे.तसेच त्यापुढील प्रत्येक शनिवारी अनुक्रमे गिटारवादक,हळदीकुंकू ओटीभरण व शिव स्वर्णिम संगीत उत्सव, गितरामायण नृत्य असे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.याशिवाय खास महिलांसाठी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये महिलांसाठी शिवनाम,शनिनाम जपसाधना, भजनप्रभा, स्पर्धा,प्रश्नमंजुषा कथ्थक नृत्य सामूहिक खेळांचे आयोजन करण्यात आले आहे.

## सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी अविनाश डेरे यांना बढती



खंडाळा : एकतीस वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर कवठे (ता.वाई) येथील अविनाश प्रल्हाद डेरे यांना सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक पदी बढती मिळाली आहे.

जिल्ह्यातील सातारा मुख्यालय, महाबळेश्वर,पाचगणी,खंडाळा,शिरवळ या ठिकाणी सेवा बजावली आहे. जोशीविहीर येथील महामार्गावर पोलीस मदत केंद्रात अविनाश डेरे कार्यरत आहेत. पोलीस खात्यामध्ये पोलीस कॉन्सटेबल ते हवालदार म्हणून कर्तव्य बजावणारे श्री. डेरे यांना सेवा कालावधीत उत्कृष्ट कामगिरी बद्दल १२५ बक्षिसे प्राप्त झाली आहेत. त्यांना नुकतीच सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी बढती मिळाली. त्याबद्दल सहय्यक पोलीस निरीक्षक वर्षा शिंदे,पोलीस उपनिरीक्षक शामराव गोरड , बाजीराव वाघमोडे,नवनाथ लिमण, आदींनी अभिनंदन केले.

## साताऱ्यातील हेरिटेज इमारतींचा परिसर आता 'नो फ्लेक्स झोन'

### प्रशासकीय सभेत निर्णय : २८८ विषयांना मंजुरी; दोन रद्द

सातारा : सातारा शहरातील हेरिटेज इमारतींचा परिसर 'नो हॉकर्स झोन' व 'नो फ्लेक्स झोन' म्हणून जाहीर करण्याचा विषय पालिकेच्या प्रशासकीय सभेत मंजूर करण्यात आला. या व्यतिरिक्त शहर व हद्दवाढ भागातील रस्ते दुरुस्ती, नवीन पथदिवे बसविण्यासह पथदिव्यांचे डीजीटल मॉनिटरिंग, पोवई नाका येथे शीवथीर्थ नावाचा फलक लावणे, गुरुवार बागेत सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे यांसह २८८ विषयांना मंजूरी देण्यात आली. दोन विषय दुबार झाल्याने ते रद्द करण्यात आले.

सातारा पालिकेच्या कमिटी हॉलमध्ये सोमवारी सायंकाळी चार वाजता मुख्याधिकारी अभिजित बापट यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्यासभेला पाणीपुरवठा अभियंता शहाजी वाठारे, आरोग्य निरिक्षक प्रकाश राठोड, वृक्ष विभाग प्रमुख सुधीर चव्हाण, संगणक अभियंता स्मीता पाटील, अतिक्रमण विभाग प्रमुख प्रशांत निकम, लेखापाल महेश सावंत, विदयुत अभियंता अविनाश शिंदे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

अजेंड्यावर शहर विकास व कार्योत्तर मंजुरीचे २९० विषय घेण्यात आले होते. सभा सचिव अतुल दिसले यांनी प्रत्येक विषयाचे तपशीलवार वाचन केले. कास तलाव परिसराचा विकास करणे, माझी वसुंधरा अभियानांतर्गत शहरात १५० किलो वॅट क्षमतेचा सोलर संच उभारणे, शहर व हद्दवाढ भागात नवीन पथदिवे बसविणे, ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी शहरात ठिकठिकाणी बेंच बसविणे, जकातवाडी येथे जल तपासणी प्रयोगशाळा सुरू करणे, पालिकेत हिरकणी कक्ष स्थापण करणे, शाहू कला मंदिर येथे रस्ता काँक्रिटीकरण करणे, सातारा शहरातील बंद सिग्नल यंत्रणा सुरू करणे, शहरात ग्रेनाईट बोर्ड बसविणे, रस्ते दुरुस्ती, गटारांची निर्मिती यांसह २८८ विषय यावेळी मंजूर करण्यात आले.

## तांत्रिक अडचणीमुळे पुन्हा साताऱ्यात पाणी कपात लागू

### मुख्याधिकारी अभिजीत बापट यांची माहिती

**सातारा :** सातारा शहराला पाणीपुरवठा करताना आवश्यक असणाऱ्या शेंद्रे सब स्टेशनच्या वीज पुरवठ्यामध्ये व्यत्यय येत आहे .त्यामुळे वीज वितरण कंपनीकडून वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे परिणामी पंपिंग स्टेशनमध्ये विस्कळीतपणा येत असल्याने कास व शहापूर पाणीपुरवठा योजनेचा पाणीपुरवठा एक दिवसासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे .सातारा नगरपालिकेने टाकीनिहाय पाणी कपातीचे वेळापत्रक जाहीर केले आहे याची माहिती मुख्याधिकारी अभिजीत बापट यांनी दिली आहे

पत्रकार नमूद आहे की सातारा शहराच्या काही भागास पाणीपुरवठा कास तलावातून होत आहे . नवीन पाईपलाईनचे काम सुरू आहे .सदर काम करताना जुनी पाईपलाईन काही प्रमाणात लिकेज होत आहे त्यामुळे कास उदभवातून पाणीपुरवठा पूर्ण क्षमतेने होत नसल्याने शहराच्या काही भागात कमी क्षमतेने पाणीपुरवठा होत आहे तसेच उरमोडी नदीतून पाणी उचलताना शेंद्रे सब स्टेशन येथे खंडित वीज पुरवठ्यामुळे पूर्ण क्षमतेने टाक्या भरल्या जात नाही त्यामुळे उरमोडी कार्यक्षेत्रातील शहराच्या भागांना पाणीपुरवठा सुरळीत होत नाही

यामुळे कास माध्यमातील व शहापूर माध्यमातील प्रत्येक भागामध्ये एक दिवसाचा शट डाऊन ठेवणे आवश्यक ठरले आहे १६ ऑगस्ट पासून ही पाणी कपात लागू होणार आहे

## पवनचक्की कंपनी विरोधात मनसेचे उपोषण

### राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसची मागणी : तहसीलदारांना निवेदन

**पाटण :** तालुक्यातील मोरणा विभागात पनामा कंपनीने अनधिकृत पवनचक्क्या उभारून शेतकऱ्यांची फसवणुकी केल्याचा आरोप करत याविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पाटण तालुकाध्यक्ष गोरख नारकर व बाधीत शेतकऱ्यांनी पाचगणी, ता. पाटण येथे सोमवार दि. १२ रोजी आमरण उपोषण सुरू केले आहे.




याबाबत तालुकाध्यक्ष नारकर यांनी सांगितले की, मोरणा पठारावर उभारलेल्या पवनचक्क्यामधील काही ठिकाणी मायक्रोसाईटिंग मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन झाले आहे. यामधील टॉवर क्रमांक २५ व वनविभागालगत उभारलेले टॉवर यांच्यावर तातडीने कारवाईची मागणी मनसेने केली होती. या टॉवरमुळे बाधित झालेले शेतकरी व तक्रारदारांनी पाचगणी व महाराष्ट्र महाउर्जा विकास अभिकरण पुणे याठिकाणी आंदोलन व उपोषण करून शासनाची होत असलेली फसवणुक निदर्शनास आणून दिली होती. कंपनीने फसवेगिरी केल्याने संबधित पवनचक्की टॉवर तात्काळ बंद करून कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात यावे. तसेच कंपनीने बेकायदेशीरपणे टॉवर उभारणी करुन करोडो रुपयांचे उत्पन्न मिळवुन शासनाची फसवणूक केली आहे. हे मिळालेले उत्पन्न शासन दरबारी जमा करण्याची मागणी पुराव्यानिशी शासनास निदर्शनास आणून दिली आहे. शासनाकडून कंपनीला मुलभूत सुविधा, संमतीपत्र रद्द करण्याची शिफारस जानेवारी २०२४ मध्ये होऊन अद्याप कोणतीही कारवाई केलेली दिसत नाही. शासन व संबंधित कंपनी तक्रारदार शेतकऱ्यांची वारंवार दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत असल्यामुळे सोमवार दि.१२ रोजी बाधित शेतकरी व मनसेचे तालुकाध्यक्ष गोरख नारकर यांनी आमरण उपोषण सूरू केले आहे.

उपोषणाच्या पहिल्या दिवशी पाटणचे वनक्षेत्रपाल आर. एस. नलवडे, कोयना पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप शितोळे, उर्जा विभागाचे अधिकारी मोहिते, पनामा विंडचे प्रतिनिधी, मंडलाधिकारी, तलाठी, पोलीस पाटील आदीनी भेट दिली.

## श्रावणी सोमवार निमित्त श्रीक्षेत्र मेरुलिंगला भाविकांची गर्दी

**मेढा :** जावळी तालुक्यातील ऐतिहासिक तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र मेरुलिंग येथे शंभू महादेवाचे स्वयंभू पिंड असून या ठिकाणी श्रावणी सोमवार निमित्त भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. सह्याद्रीच्या उंच डोंगरावर श्रीक्षेत्र मेरुलिंग वसलेले असून निसर्गाने परिपूर्ण असे नटलेले हे श्री क्षेत्र मेरुलिंग आहे. या ठिकाणी सातारा जिल्ह्यासह पुणे जिल्हा, मुंबई येथूनही भाविक निसर्गाचा मनमुराद आनंद लुटण्याबरोबरच शंभू महादेवाच्या दर्शनासाठी मोठी गर्दी करतात.



या ठिकाणी श्रीक्षेत्र मेरुलिंग ग्रामस्थ युवक मंडळ हे भाविकांची सोय करण्यासाठी परिश्रम घेतात.

गर्द धुके पावसाचा शिडकाव श्रीक्षेत्र मेरूलिंग हे उंच डोंगरावर वसलेले असून या ठिकाणी थंड हवा राहते. पावसाळ्यामुळे धुक्याची दुलई मंदिर परिसरात पसरत असल्यामुळे पर्यटक देवदर्शनाबरोबरच निसर्गाचा देखील मनमोराद आनंद लुटतात. मेरूलिंगच्या जवळच बंड्याचा कडा म्हणून प्रसिद्ध असे पठार आहे. या ठिकाणी विविध रंगांची फुले देखील उमललेली पाहायला मिळत असल्यामुळे पर्यटक पर्यटनाचा देखील आनंद लुटताना दिसून आले.

## माण शिक्षक संघाकडून नवनियुक्त केंद्रप्रुखांचा सत्कार



**दहिवडी :** शिवाजीराव पाटील पुरस्कृत माण तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने पंचायत समिती माण - दहिवडी येथे विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख पदी बढती मिळालेल्या शिक्षकांचा सत्कार गटविकास अधिकारी प्रदीप शेंडगे यांच्या हस्ते करण्यात आला. माण तालुका प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष महेंद्र अवघडे,विभागीय कार्याध्यक्ष मोहनराव जाधव, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी शंकर इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रदीप शेंडगे म्हणाले,प्रतिकूल परिस्थितीतही यश संपादन करण्याची परंपरा माण तालुक्याला आहे.इथले अनेक लोक जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर उत्तुंग भरारी घेत आहेत. त्यामुळे पर्यवेक्षिय यंत्रणेत काम करण्यास संधी मिळालेल्या लोकांनी आपला शिक्षकी पेशातील अनुभव पणाला लावून तालुक्याला वेगळ्या उंचीवर नेण्यासाठी प्रयत्न करावेत.सातारा जिल्हा परिषदेने शिक्षण विभागात विविध प्रकारच्या बढती केल्याने गुणवत्ता वाढीसाठी आता अनुकूल स्थिती आहे.शिक्षकांचे तालुका स्तरावरील प्रश्न संघटने मार्फत समजून घेऊन नक्की सोडवू.

यावेळी नूतन विस्तार अधिकारी दंडीले,केंद्रप्रमुख महेंद्र हजारे,वर्षा गायकवाड,वसंत जगदाळे,दीपक पतंगे,नंदकुमार तुपे,महादेव कदम,विजय गंबरे,साधना झनझने,शोभा पवार यांचा सत्कार शिक्षक संघाच्या वतीने करण्यात आला.

यावेळी माण पंचायत समितीच्या गटविकास अधिकारीपदी नुकतीच नियुक्ती झालेले प्रदीप शेंडगे यांचाही सत्कार करण्यात आला.

महेंद्र अवघडे यांनी प्रास्ताविक केले.रामभाऊ खाडे यांनी सूत्रसंचालन केले तर आभार महेश माने यांनी मानले.यावेळी पुंडलिक खराडे,किशोर देवकर,हणमंत रणपिसे,दत्ता खाडे,विक्रम माने यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

### जिल्हा बँक भरतीच्या आमिषाने तालुक्यातील तरुणांचे शोषण करु नका : विराज शिंदे यांचा इशारा

**सातारा :** सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत विविध २९६ पदांसाठी निघालेल्या भरतीचे आमिष दाखवून सत्ताधारी गट सर्वसामान्य घरांतील तरुणांचे आर्थिक, मानसिक व सामाजिक शोषण करण्याचा प्रयत्न करीत असून भरतीची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवावी अशी मागणी काँग्रेसचे नेते विराज शिंदे यांनी केली आहे. अशा पद्धतीची घटना आढळल्यास वाई ,खंडाळा, महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघातील तरुण त्यांना माफ करणार नाहीत असा इशाराही त्यांनी दिला आहे.

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत विविध पदांसाठी भरती निघाली असून त्याबाबतच्या जाहिराती देखील प्रकाशित झाल्या आहेत. या जाहिरातीचा उल्लेख करुन विराज शिंदे म्हणाले की, जिल्हा बँकेत भरती निघाली ही चांगली गोष्ट आहे. पण या भरतीच्या नावाने तरुणांची फसवणूक होणार हे निश्चित आहे.

कारण विद्यमान आमदार आणि त्यांचे तीन चार समर्थक, नातेवाईक जिल्हा बँकेत संचालक म्हणून कार्यरत आहेत. विधानसभा निवडणुका डोळ्यांसमोर असताना ही भरती जाहिरात आली हा निश्चितच योगायोग नाही. वाई खंडाळा महाबळेश्वर मतदारसंघातील अनेक युवकांना नोकरीचे गाजर दाखविण्यात आले आहे.

## हिलरेंज माध्यमिक विद्यालय ही शाळांमध्ये प्रेरणादायी व आदर्श शाळा : शिक्षण आयुक्त सूरज मांढरे

**वाई :** भिलार येथील हिलरेंज एज्युकेशन संस्थेच्या हिलरेंज माध्यमिक विद्यालय ही शिक्षण क्षेत्रांत माध्यमिक शाळांमध्ये प्रेरणादायी व आदर्श असून येथील वैविध्यपूर्ण उपक्रम हे विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासामध्ये भर घालत असल्याचे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी केले.



महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागांतर्गत विद्यार्थी गुणवत्ता विकास अभियाना अंतर्गत शाळा भेटीत आयुक्त सुरज मांढरे यांनी भिलार येथील हिलरेंज एज्युकेशन सोसायटीच्या शाळांना भेट दिली. यावेळी त्यांचे सोबत कोल्हापूर विभागाचे शिक्षण उपसंचालक महेश चोथे , प्राथमिक शिक्षण अधिकारी शबनम मुजावर , माध्यमिक शिक्षण अधिकारी प्रभावती कोळेकर , गटशिक्षण अधिकारी आनंद पळसे, हिलरेंज एज्युकेशन सोसायटीचे सचिव जतिन भिलारे, संचालिका डॉ. तेजस्विनी भिलारे, मुख्याध्यापक मुकुंद शिंदे, शिक्षण विस्तार अधिकारी अभिजीत भालेराव, एन.के.धनावडे, मेटगुताड केंद्राचे केंद्रप्रमुख दगडू ढेबे, भिलार केंद्राचे केंद्रप्रमुख संजय पारठे आदी मान्यवर उपस्थित होते. शिक्षण आयुक्त मांढरे यांचे स्वागत जतीन भिलारे व डॉ. तेजस्विनी भिलारे यांनी केले

जवळपास एक तासाच्या या भेटीदरम्यान शाळेतील सुविधा, विद्यार्थी गुणवत्ता विकास महाअभियान कार्यक्रम, शिक्षणाचा दर्जा व शासन निधीचा वापर या शाळेने उत्तम राबवून चांगल्या दर्जाच्या सुविधा उपलब्ध केलेल्या दिसून येतात. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीने पूरक पोषण आहारात विद्यार्थी समाधानी असून, स्काऊट गाईड कॅम्प, कला क्रीडा विषयक तासिका, विद्यार्थी वाचन व लेखन तसेच आकलन क्षमता, मैदानी खेळ व व्यवहारज्ञान हे अद्यावत आहे. याबाबत शाळेचे सर्व उपक्रम चांगले असून ते प्रभावीपणे राबवले जातात. याबरोबरच त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. बहुतांश सर्वच बाबतीमध्ये हिलरेंजचे विद्यार्थी पारंगत असल्याचे आयुक्त सुरज मांढरे यांनी यावेळी सांगितले.

या दरम्यान त्यांनी वाचलेल्या पुस्तकांवर मुलांचे अभिप्राय, जीवनकौशल्यावर आधारित दैनंदिन जीवनातील व्यवहारातील विविध प्रश्न, त्यांची सोडवणूक कशी कराल या संदर्भात मुलांशी बराच वेळ मनमोकळी चर्चा व मार्गदर्शन त्याचप्रमाणे विविध उपक्रम पाहणी केली.

शाळेच्या उपक्रमामध्ये व्यक्तिमत्व विकास यासाठी आनंददायी शनिवार हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात घ्यावा अशा सूचना यावेळी सूरज मांढरे यांनी शाळा प्रशासनाला दिल्या. या भेटी दरम्यान आयुक्त सूरज मांढरे यांनी पुस्तकांच्या गावची सुद्धा पाहणी केली. यावेळी त्यांना पुस्तकांचे गाव कार्यालयात चित्रफीत दाखवण्यात आली.

## क्राईम

### कलेढोण येथील सर्पमित्राचा सर्पदंशाने मृत्यू

**मायणी :** कलेढोण तालुका खटाव येथील सर्पमित्र महेश दत्तात्रय बाबर वय ३२ या तरुणाचा नाग चावल्याने मृत्यू झाल्याची घटना येथे घडली. याबाबत अधिक माहिती अशी की विखळे येथील देशमुख वस्तीवर एका शेतकऱ्याच्या घरात नाग निघाला म्हणून संबंधित सर्पमित्राला या ठिकाणी बोलावण्यात आले होते त्या अगोदर त्या शेतकऱ्यांच्या दोन कोंबड्या त्या नागाने मारल्या होत्या संबंधित नाग बिळात शिरल्यानंतर त्या सर्प मित्राने व त्याच्या एका मित्राने ते बीड उखडून नागाला बाहेर काढून पिशवीत भरत असताना सर्पमित्राला नागाने चावा घेतला चावा घेतल्यानंतर त्याच्या मित्राने त्याला दवाखान्यात जाण्याविषयी विनवणी केली परंतु त्याने टाळाटाळ करत दवाखान्यात जाण्यास विलंब लावला कलेढोन येतील कुटीर रुग्णालयात जाऊन तेथे असणाऱ्या संबंधितने अँटिडोस सलाईन मधून दिल्यानंतर म्बुलन्स बोलून त्या म्बुलन्स मध्ये पेशंटला पुढे शिफ्ट केले परंतु म्बुलन्स चा रस्त्यात

### ट्रक वरून पडून जखमी झालेल्याचा मृत्यू

**सातारा :** ट्रकवर पडून गंभीर जखमी झालेल्या यलमरवाडी तालुका खटाव येथील इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे राजेंद्र पांडुरंग बागल वय ४९ असे मयत इसमाचे नाव आहे याप्रकरणी खाजगी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर एस के तपासे यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात खबर दिली आहे

याबाबतचे अधिक माहिती अशी बागल हे दिनांक २२ जुलै रोजी ट्रक वरून पडून जखमी झाले होते त्यांना देगाव येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते मात्र त्यांच्या प्रकृतीत फरक पडला नाही तेथून ते साताऱ्यात अधिक उपचारासाठी खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल झाले तेव्हा त्यांचा दिनांक ११ ऑगस्ट रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला हवालदार एस के सूर्यवंशी अधिक तपास करत आहेत

### पळशी येथील युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**सातारा :** पळशी तालुका खंडाळा येथील बावीस वर्षीय युवकाने भरगुडे वस्ती लगतच्या कॅनॉल येथे टोमॅटोच्या शेतात लिंबाच्या झाडाला नायलॉन दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली धीरज बद्रीप्रसाद टमटा वय २२ राहणार गणपती मंदिर शेजारी पळशी मूळ राहणार पिथोरा गड उत्तर प्रदेश असे मयताचे नाव आहे

याप्रकरणी बद्री प्रकाश रामराव टमटा वय ५०ड् यांनी शिरवळ पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली आहे संबंधित युवकांच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही दिनांक ११ ऑगस्ट रोजी सकाळी सात वाजता धीरज याचा मृतदेह बरगुडे वस्तीच्या कॅनॉललावर असणाऱ्या टोमॅटोच्या शेतात लिंबाच्या झाडाला गळफास घेतलेला अवस्थेत आढळून आला .सहाय्यक फौजदार बारेला अधिक तपास करत आहेत

### अनोळखी बेवारस मृतदेहाची ओळख पटवण्याचे आवाहन

**सातारा :** सातारा तालुका हद्दीत एक बेवारस मृतदेह सापडला असून त्याबाबतची ओळख पटवण्याचे आवाहन सातारा तालुका पोलिसांनी केले आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक ४ जुलै रोजी मध्यरात्रीच्या सुमारास वर्ये, ता. सातारा गावच्या हद्दीतील हॉटेल मानस व हॉटेल जगदंब नजीक असलेल्या सर्व्हिस रोडवर साचलेल्या पाण्यात अनोळखी पुरुष जातीचे अंदाजे ५० वर्षे वयाच्या इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. मृतदेहाच्या अंगावर शर्ट नसून काळ्या रंगाची पॅन्ट, काळी पांढरी मिशी व दाढी आहे. संबंधित इसमाबाबत कोणास काही माहिती असल्यास त्याबाबत सातारा तालुका पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन, सातारा तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ए. एस. मोरडे यांनी केले आहे.

### ग्रेड सेपरेटरमध्ये दोन गटात राडा

**सातारा :** सातारा पोवई नाक्यावरील ग्रेड सेपरेटरमध्ये तरूणांच्या दोन गटांत मारामारी झाली. याचा व्हिडीओ व्हायरलं झाला. ही घटना सोमवारी दुपारी घडली. यानंतर पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे तरूणांचा शोध सुरू केला आहे. दरम्यान, ग्रेड सेपरेटरमधील सुरक्षिततेचा विषय ऐरणीवर आला आहे. या घटनेची नोंद रात्री उशिरापर्यंत झाली नव्हती.

पोवईनाक्यावरून बसस्थानकाकडे जाणाऱ्या ग्रेड सेपरेटरमध्ये चार तरूण एकमेकांना मारहाण करत होते. काही वेळ हा वाद सुरू होता. तेथून जाणाऱ्या एका वाहन चालकाने त्यांच्या भांडणाचा व्हिडीओ रेकॉर्डिंग केला. सोशल मीडियावर हा व्हिडीओ व्हायरलं झाल्यानंतर सातारा शहर पोलिसांनी संबंधित तरूणांचा शोध सुरू केला. हा प्रकार सोमवारी घडला असल्याचे समोर येत आहे. संबंधित तरूण कोणत्या महाविद्यालयातील आहेत, याचा शोध घेतला जात आहे. रात्री उशिरापर्यंत सातारा शहर पोलिस ठाण्यात या घटनेची नोंद झाली नव्हती.

दरम्यान, ग्रेड सेपरेटरमधून चालत जाणे धोकादायक आहे, असे असताना शॉर्टकट म्हणून महाविद्यालयीन तरूण या ग्रेड सेपरेटरचा वापर करत आहेत. ही वादावादी झाल्यानंतर तरूणांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सर्व गरोदर मातांची एचआयव्ही व गुप्तरोग तपासणी प्राधान्याने करुन घ्या : जिल्हाधिकारी अमोल येडगे

**कोल्हापूर :** प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये जिल्ह्यातील सर्व गरोदर मातांची एचआयव्ही व गुप्तरोग तपासणी प्राधान्याने करुन घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केल्या.



जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समितीची बैठक जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात घेण्यात आली. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सरिता थोरात, जिल्हा कार्यक्रम अधिकारी दीपा शिपुरकर, जिल्हा साथ रोग वैद्यकीय अधिकारी डॉ. सुशांत रेवडेकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. परवेज पटेल, शहर क्षयरोग अधिकारी डॉ.अमर पोवार, एआरटी सेंटरचे वैद्यकीय अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी तसेच इतर समिती सदस्य उपस्थित होते. अतिजोखमीच्या गटाच्या अडचणी सोडवण्यासाठी जिल्हास्तरीय समुदाय संसाधन समूह समितीची स्थापना या बैठकीत करण्यात आली. यावेळी संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत एचआयव्ही संसर्गित प्रलंबित प्रकरणे जिल्हाधिकारी यांच्या सूचनेमुळे मार्गी लागल्याबद्दल विहान प्रकल्प तसेच सर्व स्वयंसेवी संस्थांमार्फत जिल्हाधिकारी येडगे यांचे आभार मानण्यात आले.

शिरोली, कागल, गोकुळ शिरगाव या तिन्ही एमआयडीसी क्षेत्रातील स्थलांतरित कामगारांसाठी एचआयव्ही तपासणी कार्यक्रम प्रभावीपणे राबवा. जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांमध्ये एच आय व्ही कीट साठवणुकीसाठी रेफ्रिजरेटरची खरेदी करण्यासाठीचा प्रस्ताव सादर करा, अशा सूचना यावेळी जिल्हाधिकारी श्री. येडगे यांनी केल्या.

वेश्या व्यवसाय करणाऱ्या तृतीयपंथीयांसाठी प्रमाणित कार्यप्रणाली तयार करण्याच्या सूचना पोलीस विभागाला देण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या एच आय व्ही एड्स राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत कोल्हापूर मधील जान्हवी कुलकर्णी हिने तृतीय क्रमांक पटकावल्याबद्दल जिल्हाधिकारी श्री. येडगे यांनी कौतुक केले.

# डोंगरसोनीत अंगणवाडीचे काम निकृष्ट

## ग्रा. पं. सदस्य अमित झांबरे यांचा आरोप : वर्षभरातच अंगणवाडीची इमारत भेगाळली

**तासगाव :** तासगाव तालुक्यातील डोंगरसोनी येथील अंगणवाडी क्र. १८७ चे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले आहे. ही इमारत ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यागोदरच त्याला भेगा पडल्या आहेत. त्यामुळे या बांधकामाची चौकशी व्हावी. निकृष्ट बांधकाम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य अमित झांबरे यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन गटविकास अधिकारी डॉ. संताजी पाटील यांना दिले आहे.



डोंगरसोनी येथील कै. गोविंद दादा झांबरे यांच्या स्मरणार्थ श्रीमती तानुबाई गोविंद झांबरे यांनी अंगणवाडी क्र. १८७ साठी दोन गुंठे जागा दान केली आहे. जिल्हा परिषदेच्या जिल्हा वार्षिक योजनेतून या कामासाठी ११ लाख २० हजार रुपये या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम मंजूर करण्यात आली होती. अनिल बबन झांबरे यांनी या कामाची निविदा भरली होती. त्यांना हे काम मिळाले. या कामावर १० लाख रुपये खर्च करण्यात आले.

१५ फेब्रुवारी २०२३ रोजी या अंगणवाडीच्या इमारतीचे काम सुरू झाले. तर १४ जुलै २०२३ रोजी हे काम पूर्ण झाले. मात्र काम पूर्ण होऊन एक वर्ष होण्यागोदरच या इमारतीच्या भिंतींना भेगा पडण्यास सुरुवात झाली आहे. हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले आहे. ही इमारत ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्याअगोदरच भिंतींना भेगा पडल्याने ग्रामपंचायत सदस्य अमित झांबरे आक्रमक झाले आहेत.

झांबरे यांनी या निकृष्ट कामाबाबत गटविकास अधिकारी डॉ. संताजी पाटील व बांधकाम विभागाचे उपअभियंता यांना लेखी तक्रार दिली आहे. निकृष्ट बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराची चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

डोंगरसोनी येथील अंगणवाडी क्र १८७ चे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याची तक्रार ग्रामपंचायत सदस्य अमित झांबरे यांनी केली आहे. यानंतर बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी चक्क हे काम करणाऱ्या ठेकेदाराच्या गाडीतून येऊन बांधकामाची पाहणी केली. जर शासकीय अधिकारी ठेकेदाराच्या गाडीत बसून निकृष्ट बांधकामाची पाहणी करत असतील तर ठेकेदारावर कारवाई करायची नैतिकता त्यांच्याकडे आहे का, असा सवाल झांबरे यांनी केला आहे.

# बेदाणा सौद्याची सहाय्यक निबंधकांकडून प्रत्यक्ष पाहणी

**तासगाव :** तासगाव बाजार समितीत सोमवारी सहाय्यक निबंध रंजना बारहत्ते यांनी बेदाणा उधळणीची पाहणी केली.आजच्या सौद्यात मात्र बारहत्ते यांच्या प्रत्यक्ष पाहणी दरम्यान बेदाणा उधळण थांबल्याचे दिसून आले.यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी उधळणीवर तीव्र संताप व्यक्त केला. या उधळणीचा वस्तुनिष्ठ अहवाल दुय्यम निबंधक सांगली यांना पाठवणार असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली.

यावेळी निमणीचे उपसरपंच आर.डी.पाटील उपस्थित होते.येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत बेदाणा उधळण करून अडते व व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची मोठी लूट सुरू आहे,अशी तक्रार सांगली जिल्हा मनसे संघटक अमोल काळे यांनी दिली होती.बेदाणा उधळण थांबवून शेतकऱ्यांची लूट थांबवा अन्यथा खळ खट्याक आंदोलन करण्याचा इशारा दिल्या नंतर डी डी आरच्या आदेशानुसार बेदाणा उधळनीची सोमवारी १२ ऑगस्ट रोजी प्रत्यक्ष उपस्थित राहून सहाय्यक निबंधक रंजना बारहाते यांनी पाहणी केली.यावेळी नेहमी सौदे काढताना बेसुमार पद्धतीने उधळला जाणारा बेदाणा सोमवारी व्यापारी बॉक्स मधून मूठ भरून घेत ती मूठ परत बॉक्समध्ये टाकत असल्याचे चित्र दिसले.

इतर वेळी हा बेदाणा उधळून लोखंडी जाळीत सांडला जात होता,व त्याची तूट मनमानी पद्धतीने धरली जात होती.मात्र सहाय्यक निबंधकांच्या पाहणीमुळे व्यापारी हबकले होते.काही जणांनी सौदयास दांडी मारली होती.यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी बेदाणा उधळणीवर संतप्त प्रतिक्रिया दिल्या,असून उधळण पूर्णपणे बंद होण्याची मागणी त्यांनी निबंध सहायक निबंधकांच्याकडे केली आहे.

# अजितदादांनी बैठक घेऊनही चाकणचा तिढा सुटेना

**पुणे :** चाकण औद्योगिक वसाहतीतील (एमआयडीसी) वाहतूक कोंडीसह अपुऱ्या पायाभूत सुविधांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उच्चस्तरीय बैठक काही दिवसांपूर्वी मुंबईत घेतली होती. त्यानंतर स्थानिक यंत्रणांनी चाकणमधील उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी पावले उचलणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात केवळ चर्चेच्या फेऱ्या सुरू असून, उपाययोजना करण्यासाठी पावले उचण्यात आलेली नाहीत.

चाकणमधील स्थानिकांसह उद्योगांची कोंडी होऊ लागल्याने त्यांनी सरकारला निर्वाणीचा इशारा दिला होता. वाहतूक कोंडीची समस्या सुटत नसल्याने औद्योगिक वसाहत बंद करण्याचे जाहीर करण्यात आले होते. त्यानंतर ३१ जुलैला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तातडीने मुंबईत उच्चस्तरीय बैठक घेऊन उपाययोजना करण्याची तंबी शासकीय यंत्रणांना दिली. यानंतर चाकण एमआयडीसीतील अतिक्रमणे हटवून कोंडी कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या एकमेव उपाययोजनेशिवाय इतर कोणत्याही हालचाली शासकीय यंत्रणांकडून झालेल्या नाहीत.

उपमुख्यमंत्री पवार यांनी उच्चस्तरीय बैठक घेतल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार नुकतीच एक बैठक घेण्यात आली. या बैठकीला जिल्हा उद्योग केंद्राच्या सरव्यवस्थापक वृषाली सोने, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे विभागीय अधिकारी सारंग साबळे, सावर्जनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मिलिंद बारभाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे उपअभियंता एस.आर.जोशी आणि फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजचे सचिव दिलीप बटवाल उपस्थित होते.

# लोकसभा निवडणुकीत महायुती सोबत असतो तर सभापती पद परत मिळाले असते : आ. श्रीमंत रामराजे

**फलटण :** गत लोकसभा निवडणुकीत आपण महायुती सोबत गेलो असतो तर विधान परिषद सभापतीपद पुन्हा मिळाले असते, तथापि आपण पंतप्रधान झालो तरी कार्यकर्ता सोबत नसेल तर त्याचा काही उपयोग नसल्याने कार्यकर्त्यांच्या भावना, त्यांचे विचार, अपेक्षा लक्षात घेऊन आपण त्यावेळी निर्णय घेतल्याचे आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी स्पष्ट केले.



आसू, ता. फलटण येथील विविध विकास कामांची उद्घाटने व भूमिपूजन आणि गुणवंत विद्यार्थी व खेळाडू वगैरेंच्या सत्कारानंतर आयोजित जाहीर सभेत आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर बोलत होते. अध्यक्षस्थानी आ. दिपकराव चव्हाण होते. यावेळी सातारा जिल्हा परिषद माजी अध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, पंचायत समिती माजी सभापती श्रीमंत विश्वजितराजे नाईक निंबाळकर,श्रीराम सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन महादेवराव पवार (आबा), संचालक स्वामीनाथ साबळे, राजन फराटे, अशोक तावरे यांच्यासह आसू सह पंचक्रोशीतील राजे गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

आमचा भाजपा, देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांना विरोध नाही. जे काही घडले आहे, ते आपण देवेंद्र फडणवीस यांना अगोदर स्पष्ट पणे सांगितले होते, रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या व्यासपीठावर आम्ही जाऊ शकत नसल्याची स्पष्ट कल्पना त्यांना दिल्याचे आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी निदर्शनास आणून दिले.

आम्ही तालुक्याच्या राजकारण आणि समाजकारणात आलो त्यावेळी बिघडलेली घडी पुन्हा नीट बसवावी, लोकांचे हित जपले जावे यासाठी आम्ही पुढाकार घेतल्याचे, अनेक प्रश्नांची सोडवणूक केल्याचे सांगत त्यावेळी शिवरुपराजे यांचे योगदान काय किंवा तालुक्यातील कोणत्या अडचणीत शिवरुपराजे उभे राहिले आहेत, असा सवाल करीत श्रीराम सहकारी साखर कारखाना किंवा न्यू फलटण शुगर बंद पडल्यानंतर तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी आणि कामगारांचा प्रश्न समोर आला त्यावेळी आम्ही विविध मार्गाने प्रयत्न करुन आज दोन्ही साखर कारखाने उत्तम प्रकारे सुरु असून ऊस उत्पादक शेतकरी व कामगार समाधानी असल्याचे निदर्शनास आणून देत आम्ही पूर्व भागाची माफी मागितली पाहिजे, कारण ह्या अशा माणसाच्या मागे तुम्हा जनतेला उभे रहायला आम्ही सांगितले आणि तुम्ही ते स्वीकारले त्यामुळे आम्ही दोषी असल्याची स्पष्ट कबुली आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी दिली.

# वायफळेतील चिमुरड्यावर झाली मोफत शस्त्रक्रिया

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून मदत : मंगेश चिवटे ठरले 'देवदूत'

**तासगाव :** तालुक्यातील वायफळे येथील यश सुनिल नलवडे या दोन वर्षीय चिमुरड्यावर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वैद्यकीय सहाय्यता निधीतून या शस्त्रक्रियेचा खर्च करण्यात आला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे हे याकामी नलवडे कुटुंबियांसाठी 'देवदूत' ठरले आहेत.

वायफळे येथील यश नलवडे याच्या आई - वडीलांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांना रोजंदारीने कामाला जावे लागते. यशचे वडील सुनिल हे गावातील एका गवंड्याच्या हाताखाली कामाला जातात. तर आई पियांका ही घरगुती कामं करुन आपल्या कुटुंबाची गुजराण करते. दोन वर्षांपूर्वी नलवडे दांपत्याला हसता - खेळता मुलगा झाला. मात्र तो सातत्याने आजारी पडत होता. त्याला श्वसनाचा त्रास होत होता.

काही दिवसांपूर्वी त्याची सांगली येथील एका खाजगी रुग्णालयात तपासणी करण्यात आली. यावेळी त्याच्या श्वासनलिकेच्या तोंडाला मांसाच्या गाठी तयार झाल्याचे दिसून आले. त्यामुळे त्याला श्वास घेताना त्रास होत होता. धाप लागत होती. त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला होता. त्यासाठीचा खर्च लाख रुपयांच्या घरात होता.

शस्त्रक्रियेचा खर्च ऐकून नलवडे कुटुंबिय भांबावून गेले. इतके पैसे कुठून आणायचे, असा सवाल त्यांना भेडसावत होता. एखाद्या शासकीय योजनेतून अथवा कोणाकडून मदत घेऊन शस्त्रक्रिया होते का, यासाठी कुटुंबाने प्रयत्न केले. मात्र कुठेच त्यांना मदत मिळाली नाही. त्यामुळे कुठूनतरी कर्ज काढून आपल्या चिमुरड्याची शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन त्यांनी केले. मात्र हातावरचे पोट असल्याने त्यांना कर्जही उपलब्ध होत नव्हते. कर्ज मिळाले तरी ते फेडायचे कसे, असाही सवाल त्यांच्या समोर होता.

अखेर त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे पश्चिम महाराष्ट्र संपर्क प्रमुख अमोल पाटील यांच्याशी संपर्क साधला. या कक्षाचे तासगाव तालुका प्रमुख सचिन शेटे यांच्या माध्यमातून अमोल पाटील यांना घरच्या हालाखीच्या परिस्थितीबद्दल सांगितले. यानंतर अमोल पाटील यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांना यश नलवडे याच्या शस्त्रक्रियेबद्दल माहिती दिली. चिवटे यांनी तातडीने या चिमुरड्याच्या शस्त्रक्रियेबद्दल यंत्रणा हलवली.

दरम्यान, यश नलवडे याला सांगली येथील मेहता हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. याठिकाणी व्हिडोओ कॉलद्वारे मंगेश चिवटे यांनी रुणाच्या नातेवाईकांशी संपर्क साधला. त्यांना धीर दिला. शिवाय पैशाची काळजी करू नये. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून यश याच्या शस्त्रक्रियेचा संपूर्ण खर्च केला जाईल. आणखी पैसे लागले तरी खास बाब म्हणून



मुख्यंमत्र्यांची स्वाक्षरी घेऊन पैसे देऊ. मात्र पैशाअभावी शस्त्रक्रिया थांबणार नाही, अशी ग्वाही दिली.

यश याच्यावर चार दिवसांपूर्वी मेहता हॉस्पिटलमध्ये यशस्वीरित्या शस्त्रक्रिया झाली. डॉ. अजित मेहता, यांनी ही शस्त्रक्रिया केली. त्यांना डॉ. पृथ्वीराज पाटील, तृप्ती पाटील यांनी सहकार्य केले. त्याला काल (सोमवार) डिस्चार्जही करण्यात आले. एक रुपयाही न घेता मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून शस्त्रक्रिया झाल्याने नलवडे कुटुबियांच्या चेहऱ्यावर मुख्यमंत्र्यांप्रती सद्भावना दिसून येत होती.